संक्षिप्त फौ.ख.क्र. 1167/2022
निशाणी क्र. 05 खाली
CNR NO. **MHGO080016182022**

# —न्यायनिर्णय—

(आज दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी घोषीत)

आरोपी विरुध्द कलम ६५(फ) महाराष्ट्र दारूबंदी कायदया अंतर्गत दंडनिय अपराधा करीता आरोप ठेवण्यात आले.

२. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या साहीत्यावरून माझ्यासमक्ष विचाराधिन मुद्दे आणि निष्कर्ष कारणमीमांसासह खालील प्रमाणे आहे :—

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २९/०७/२०२२ रोजी मौजा संत रविदास वार्ड, तिरोडा येथे आरोपीच्या ताब्यातुन ५६० किलो सडवा मोहापास रु.५६,०००/— बिना परवाना अवैधरित्या मिळुन आले? | **नाही** |
| २. | कुठला गुन्हा शाबीत झाला काय? | **नाही** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ :**

३. अभियोग पक्षाने आपली बाजू सिध्द करण्याकरिता पंच — कैलाश दलपत सुरपामे (सा.क्र.०१) यांची साक्ष नोंदविली. दुसरा पंच साक्षीदार गणेश नंदकिशोर केशरवाणी चा पुरावा सरकारी वकिलांनी विसर्जित केला. कैलाश (सा.क्र.०१) यांनी आपल्या सरतपासणीमध्ये पोलिस स्टेशनचे अधिका—यांनी त्यांना पंच म्हणुन बोलविले नव्हते असे सांगितले. त्याचप्रमाणे त्यांनी जप्ती पंचनामा वर त्यांची सही असल्याचे सांगीतले असून मजकुर माहित नसल्याचे सांगीतले. यावरून असे लक्षात येते की, सदर साक्षदाराला प्रस्तुत प्रकरणामधील मुद्देमालाच्या जप्तीबद्दल काहीही माहिती नाही. यावरून असे दिसते की, सदर साक्षदाराने अभियोग पक्षाच्या समर्थनार्थ साक्ष दिली नाही.

४. अशा प्रकरणात स्वतंत्र पंच साक्षदाराची साक्ष महत्वाची असते. परंतु या प्रकरणातील स्वतंत्र पंच कैलाश (सा.क्र.०१) यांची साक्ष लक्षात घेता असे निदर्शनास येते की, अभियोग पक्षाने आरोपीच्या ताब्यातुन ५६० किलो सडवा

मोहापास रु.५६,०००/— जप्त केले हे सिध्द केले नाही. यावरून असे स्पष्ट होते की, अभियोग पक्ष हे सिध्द करण्यास अपयशी ठरला की, घटनेच्या वेळी आरोपी ५६० किलो सडवा मोहापास रु.५६,०००/—, बिना परवाना अवैधरित्या बाळगला. तसेच सदरील प्रकरणात अभियोग पक्षाने संधी देउन सुध्दा रासायनिक विश्लेषणाचा अहवाल सादर केला नाही व इतर साक्षदार तपासले नाही. म्हणुन अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत केला असे ग्राह्य धरता येणार नाही. म्हणुन मला असे वाटते की, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द वरील कलमान्वये गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते २ चे उत्तर नकारार्थी देत आहे आणि मुद्दा क्रमांक ३ ला अनुसरून खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी— चंद्रशिला श्रावण कनोजे, रा. संत रविदास वार्ड, ता. तिरोडा, जि. गोंदिया याची महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५(फ) च्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त ५६० किलो सडवा मोहापास राज्य उत्पादन शुल्क, गोंदिया यांचेकडे अपीलाचा कालावधीनंतर विल्हेवाट लावण्याकरीता पाठविण्यात यावी.

३. या प्रकरणामध्ये आरोपीने दिलेली जमानत पुढील सहा महिण्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल व त्या जमानतीला फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७—अ अन्वये जमानत म्हणुन ग्राहय धरण्यात येईल.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर)

स्वा/—

दिनांक : १३.०३.२०२३

**(डी. आर. बडवे)**
न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी,
तिरोडा.